लोकमत
पुणे जिल्हा
बुधवार, दि. ५ नोव्हेंबर २००८

# स्विडनच्या प्रतिनिधी गावडेवाडीत येणार

**मंचर, दि. ४ (वार्ताहर) :** आदर्शगाव गावडेवाडी (ता. आंबेगाव) ची कीर्ती स्विडन देशापर्यंत पोहोचली आहे. येथे शनिवारी (दि. ८) सकाळी ११ वाजता स्वीडन देशाच्या स्विस डेव्हलपमेंट कॉरपोरेशनच्या एडीटा व्होकराल, प्रिता लाला व रिटा सरीन या महिला दौऱ्यावर येत आहेत. विशेषत: महिलांनी पुढाकार घेऊन गावात जय्यत तयारी सुरू केली आहे.

या दौऱ्याविषयी अधिक माहिती देताना महिला राजसत्ता आंदोलन पुणे जिल्हा पंचायत आघाडीच्या प्रमुख मनीषा गावडे म्हणाल्या, "गावात लोकांच्या सक्रीय सहभागातून पाणलोट क्षेत्र, वृक्षारोपन, गोबरगॅस, निर्मलग्राम, दारुबंदी, महात्मा गांधी तंटामुक्त गाव आदी उपक्रम राबविले आहेत. या कामांची पाहणी स्विडनच्या महिला प्रतिनिधी करणार आहेत. कार्यक्रम छत्रपती शिवाजी महाराज भवन येथे होईल.

या वेळी शेतकऱ्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव, महिला बचत गट मेळावा, महिलांबरोबर चर्चा व महिलांचा लेझीम कार्यक्रम होईल. महिला राजसत्ता आंदोलनाच्या सुनंदा मांदळे यांनी कार्यक्रमाची माहिती लेखी पत्राद्वारे सरपंच मीना गावडे यांना कळविली आहे.

कार्यक्रमाची जोरदार तयारी सुरू आहे. दि. १३ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी गावाला भेट दिली होती. त्या पार्श्वभूमीवर स्विडनच्या पदाधिकाऱ्यांच्या भेटीविषयी गावकऱ्यांमध्ये उत्सुकता आहे."